वसंत मनाजी वाघ व इतर
विरुध्द
अक्षय सुनिल गावडे व इतर

## निशाणी क्र. २४ वरील आदेश

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांना कैफियत दाखल करण्यासाठी झालेला उशिर माफ करुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचे म्हणणे ऐकले.

३. प्रतिवादींच्या वकीलांनी असे कथन केले की, प्रतिवादी क्र.१ यांना दि.०३/११/२०२५ रोजी समन्सची बजावणी झाली. प्रतिवादी क्र.१ हे शेतकरी असुन त्यांना शेतीच्या कामामुळे व महसुल शाखेतुन जुनी कागदपत्रे काढण्याकरीता उशिर झाल्याने दाव्यास मुदतीत कैफियत देता आली नाही. सदरचा विलंब जाणीवपुर्वक नाही. प्रतिवादींना ६६ दिवसांचा विलंब झाला आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी व खरी वस्तुस्थिती रेकॉर्डवर येण्यासाठी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन मिळावा अशी विनंती केली.

४. वादीच्या वकीलांनी त्यांचा जबाब दाखल केला असुन असे कथन केले की, प्रतिवादींना पुरेशी संधी उपलब्ध असतना देखील त्यांनी कैफियत दाखल करण्यास जाणीवपुर्वक उशीर केलेला आहे. कैफियत सोबत प्रतिवादीने कोणतेही कागदपत्र जोडलेले नाही. सबब अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास जास्तीत जास्त खर्चासह मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

५. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले.

६. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या १९०८ मधील आदेश ८ नियम १ नुसार दाव्याचे समन्स मिळाल्यापासुन जास्तीत जास्त ९० दिवसाच्या आत कैफियत व मनाई

अर्जास लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे. दाव्याच्या समन्सची बजावणी होऊन प्रतिवादींना कैफियत व मनाई अर्जास लेखी जबाब दाखल करण्यास ६६ दिवसांचा विलंब झाला आहे.

७. कोणताही दावा गुणदोषावर निकाली काढणे आवश्यक आहे. त्यासाठी दोन्ही पक्षांना पुरेशी संधी मिळणे गरजेचे आहे. प्रस्तुतचा दावा वादीने सरसनिरस मानाने वाटप करुन मिळण्याकरीता दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा विचार करीता प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर आली असता प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली काढण्यास मदत होईल. प्रतिवादींना झालेला विलंब योग्य खर्च आकारुन माफ करण्यात येतो. त्यामुळे वरील सर्व परीस्थिती विचारात घेऊन नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने व प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली काढण्यासाठी सदरचा अर्ज मंजुर करण्यास पात्र आहे. सबब खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१) निशाणी क्र.२४ वरील अर्ज वादीला रक्कम रु.३००/- खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतात.

२) प्रतिवादी क्र.१ यांना कैफियत दाखल करण्यासाठी झालेला उशिर माफ करण्यात येतो.

३) प्रतिवादी यांनी उपरोक्त खर्चाची रक्कम वादीला दिल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

सही/-
**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, घोडेगाव**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि.०२/०७/२०२६**
**घोडेगाव**

<u>**C E R T I F I C A T E**</u>

I affirm that the contents of this P. D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Smt. Sneha Sunil Pulujkar,<br>2nd Jt. Civil Judge Junior Division, Ghodegaon, Dist. Pune |
| Name of the Steno | : | J. S. Kaite, Steno Grade - III. |
| Order date | : | 02/07/2026 |
| Order signed by P.O. on | : | 02/07/2026 |
| Order uploaded on | : | 02/07/2026 |